सप्टेंबर – २००५

# थकबाकीचे वसुलीचे अॅवार्ड

**प**तसंस्थांच्या स्तरावर वाटप केलेले कर्ज जर थकित झाले तर वसुल करणेसाठी पतसंस्थांनी थकबाकीदार व त्यांचे जामिनदार यांचे विरोध्दात योग्या त्या न्यायालयात दावा दाखल करुन थकबाकी वसुलीचे अॅवार्ड मिळाणेसाठी योग्य ती कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे. किंबहूना थकबाकीदार कर्जदारांना सरसगट कोणाचाही एकाचा सुध्दा अपवाद न करता १०० टक्के थकबाकीदारांवर दावा दाखल करणे संबंधात कारवाई पूर्ण केल्यास शासकीय लेखापरिक्षण च्यावेळी ५ गुण आरक्षीत केलेले आहेत.

सर्वसाधारण थकबाकीदार कर्जदारांच्या विरोध्दात पतसंस्थाना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ९१ नुसार किंवा कलम १०१ नुसार संबंधीत न्यायालयात दावे दाखल करणे आवश्यक आहे. परंतु या प्रकरणी पतसंस्था संभ्रमा अवस्थेमध्ये असण्याची शक्यता नाकारता येत नाही. बऱ्याच मोठ्या कालावधीसाठी कलम ९१ खाली अशा प्रकारचे दावे वर्षानुवर्षे प्रलंबीत असल्याचे सर्वश्रुत आहे. परंतु कलम १०१ नुसार दाखल करण्यात आलेल्या दाव्यांचा निपटारा ६ महिन्यांच्या आत झालेल्या अलिकडच्या काळात दृष्टीक्षेपात आहे. आणि ही बाब पतसंस्थांच्या दृष्टीने हितावह आहे. म्हणून कलम १०१ अन्वयेच संबंधीत न्यायालयात थकबाकी वसुल करणेसाठी दावा दाखल करणे पतसंस्थांच्या हिताचे आहे. तसेच एखादा थकबाकी संबंधातील दावा कलम ९१ खाली बऱ्याच कालावधीसाठी प्रलंबीत असेल तर सदरहू दावा कन्सेंट टर्म फाईल करुन सदरहू दावा कलम १०१ अन्वये चालविण्यासाठी मागे घेता येवू शकतो. व अशा पध्दतीने कलम ९१ खाली दाखल केलेला व प्रलंबीत असलेला दावा वरीलप्रमाणे मागे घेऊन कलम १०१ अन्वये दाखल करणे पतसंस्थांच्या हिताचे आहे.

परंतु अनेक पतसंस्थांना थकबाकी वसुलीसाठी दावा दाखल करणे संदर्भात वेग– वेगळ्या स्तरावर अज्ञानाने, व अव्यवहारीपणाणे प्राप्त माहिती नुसार सरासपणे संभ्रम तयार केला जात असतो. एखाद्या पतसंस्थेत कर्जदारास थकबाकी वसुलीसाठी कलम १०१ अंतर्गत दावा दाखल करावयाचा असेल तर, आवश्यकता व कायद्यात तरतूद नसताना वेगळ्या माध्यामातून मधल्या प्रतिनिधींच्यामार्फत रु, २५० पासून रु. १००० पर्यंत प्रत्येक केस मागे रक्कम घेतली जाते. व त्या रकमेची पावती त्या पतसंस्थेला संबंधीत मधला प्रतिनिधी कुठलेही कारण दाखवून काही कागदपत्रे व सेवा शुल्क तसेच मदत किंवा काही गोंडस नावे देऊन रितसर पावती देवून, पतसंस्थांकडून घेतल्या जातात व पतसंस्था ह्या **न्यायालयाची कायदेशीर पूर्तता आहे** असे समजून त्या रक्कम अदाही करतात आणि हे सर्वस्वी चुकीचे, बेकायदेशीर व पतसंस्थांची लुट करणारी बाब आहे.

कलम १०१ अंतर्गत दावा दाखल करतेवेळी दाव्याच्या कागदपत्रांबरोबर जे चलन भरुन दाव्याच्या रक्कमेच्या ३ टक्के एवढी रक्कम आर.बी. आई. ट्रेझरीमध्ये भरणे १०० टक्के कायदेशीर बाब आहे. उदाहरण द्यावयाचे असेल तर मुंबइ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने मुंबई शहरातील हजारो सहकारी संस्थासाठी कलम १०१ अन्वये दाखले मिळून देण्यासाठी शासनाकडून खास बाब म्हणून एका निबंधकाची नियुक्ती करुन घेतलेली आहे. आणि संबंधीत दाखले देण्यासाठी बांद्रा येथे हे काम अत्यंत चोखपणे करण्याची व्यवस्था केलेली आहे. सदरहू

कार्यालय हे मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या, एम. अे. टी. कॉलेज, बांद्रा सिलेक्शन, बांद्रा या ठिकाणी बँकेच्या शाखेत आहे. त्या ठिकाणी एक दाव्यासाठी केवळ रु. १५० सर्वसाधारण शुल्क आकारुन व चलनाचे टक्के रक्कम आर. बी. आई. च्या ट्रेझरीमध्ये भरुन सहजपणे हे दावे दाखल करण्याची सर्व सुविधा व आवश्यक बाबीसहित अद्यावत व्यवस्था उपलब्ध आहे. आणि हे करण्यासाठी इतर आणि असे असताना काही पतसंस्था ही व्यवस्था सोडून अन्य ठिकाणी रु. २५० पासुन ते रु. १००० पर्यंत रक्कम अदा करताना शिवाय ३ टक्के रक्कम भरतात आणि ही बाब सरळसरळ पतसंस्थांची फसवणूक व लुटमार करणारी बाब आहे. म्हणून या अग्रलेखाद्वारे पतसंस्थांचे सभासद व ठेवीदारांची रक्कम वेगळ्या मार्गाने जे कोण मध्यस्थी गोंडस नावाने घेतात, त्याला कोणीही बळी पडता कामा नये. किंबहूना पतसंस्थांचा पैसा जरी कोण पावती देत असेल तरी गैरवापर होता कामा नये यासाठी हा प्रपंच आहे.

कलम १०१ अंतर्गत पतसंस्थांनी दावा दाखल करतेवेळी एकजरी हप्ता थकला तरी प्रथम नोटीस, दुसरा हप्ता थकला द्वितीय नोटीस व तिसरा हप्ता थकला तर तिसरी नोटीस व अंतीम नोटीस पतसंस्थांच्या लेटरहेडवर स्वत: देण्यात यावी. ह्या नोटीसा देण्यासाठी पतसंस्थांच्या दप्तरात कर्जदार व जामीनदारांचे जे पत्ते उपलब्ध असतील त्या पत्यावर घरचा पत्ता, कामाचा / व्यवसायाचा पत्ता व गावचा पत्ता यावर पोस्टाचा दाखाला घेवून (यु. पी. सी.) द्वारे पाठविणे आवश्यक आहे. आणि या नोटीसा पाठविणेसाठी कोणासही रक्कम अदा करणे हे सर्वस्वी चुकीचे व पतसंस्थेच्या आर्थिक नुकसानांची बाब आहे. ''पतसंस्था परिवार'' ने वेळो-वेळी प्रथम, द्वितीय व अंतीम नोटीसाचे नमुने प्रसिध्द केलेले आहेत. त्यासाठी हे काम पैसे देवून करणे पतसंस्थेच्या तिजोरीस धक्का लावण्याचे काम आहे. जे काम पतसंस्था स्वत: करु शकते, ते काम पैसे देवून पतसंस्थेचा विश्वस्त म्हणून कोणालाही करता येणार नाही किंबहूना हे अग्रहपूर्वक आम्ही कथीत करीत आहोत.

कलम १०१ अंतर्गत दावा दाखल करणेसाठी दावा कसा दाखल करावयाचा, किती प्रतीत दाखल करावयाचा , त्यास कोणती कागदपत्रे जोडायची हि माहिती ''पतसंस्था परिवाराने'' वेळोवेळी प्रसिध्द केलेली आहे. आणि हे काम सुध्दा प्रत्येक पतसंस्थेने कर्मचाऱ्यांच्या माध्यामातून करणे क्रमप्राप्त आहे. यासाठी पतसंस्थेच्या बाहेरील व्यक्तिंना प्रतिनिधींना हे काम देवून पतसंस्थेच्या तिजोरीस धक्का लावण्याचे हे दुसरे काम आहे.

पतसंस्थेने बाहेरील व्यक्तिस किंवा एजन्सीस पैसे देवून नियुक्ती करणे हे १०० टक्के टाळले पाहिजे. प्रत्येक दाव्याच्या सुनावणीस संबंधीत प्रतिनिधीने वेळेत उपस्थित राहणे आवश्यक आहे. शिवाय आपण उपस्थित आहोत त्याची रोजनाम्यावर सही जाणीव पूर्वक केली पाहिजे. तसेच सुनावणीच्या वेळेस पतसंस्थेचे म्हणणे अत्यंत ठामपणे लेखीस्वरुपात अत्यंत स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे. निश्चितपणे पतसंस्थेला ६ महिन्याच्या आत थकित कर्ज वसुल करणेसाठी संबंधीत न्यायालयाकडून ॲवार्ड मिळते हे त्रिवार सत्य आहे.एकंदरीत थकबाकीदार व त्याच्या जामीनदारास प्रथम, द्वितीय व तृतीय नोटीस देणे, दाव्याच्या कागदपत्रे तयार करणे, दावा दाखल करणे. एका दाव्यासाठी रु. १५० व दाव्याच्या रक्कमेच्या ३ टक्के रक्कम आर. बी. आई. ट्रेझरीमध्ये चलनाद्वारे भरणे, सुनावीच्या प्रत्येक तारखेस हजर राहणे, आपली बाजू मांडणे, रोजनाम्यावर न चूकता सही करणे व ॲवार्ड प्राप्त करणे यासाठी वर लिहिल्याप्रमाणे त्याच्या व्यतिरिक्त कुठल्याही गरज आवश्यकता नाही, तर कोणाच्या सल्ल्याची, मार्गदर्शनाची किंवा मध्यस्थाची

गरज नाही हे या निमित्ताने आपल्या सर्वांच्या माहितीसाठी प्रसिध्द करीत आहोत.

याउपर पतसंस्थांना आणखी काही माहिती हवी असल्यास त्यांनी कुपया बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनशी संपर्क करावा. सर्व माहिती सहजासहजी कुठलेही शुल्क न आकरता केली जाते याची कृपया नोंद घेतली जाईल.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**